महावितरण
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी-९, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
Email : ciro@mahadiscom.in website : www.mahadiscom.in दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
सी. आय. एन. नं. U४०१०९MH२००५SGC१५३६४५

जा. क्र. औसंवि/ब/ 26755 दिनांक : 24 JUN 2015

# परिपत्रक

**विषय** : महावितरण कंपनीतील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी नवीन Tailormade floater Group Mediclaim Insurance Policy उपलब्ध करणेबाबत.

**************

म.रा.वि.मं. सुत्रधारी कंपनी मर्यादित अंतर्गत महावितरण, महानिर्मिती व महापारेषण कंपनीतील कर्मचाऱ्यांच्या वेतन पुनर्निधारण करारातील मुद्दा क्र. ८ नुसार MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy सुरु करण्याबाबतचा करार दि. २३.१२.२०१४ रोजी करण्यात येऊन तिन्ही वीज कंपन्यांतील कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबातील ०५ सदस्यांसाठी MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy दि. ०१/०१/२०१५ ते दि.३१/१२/२०१५ पर्यंत लागू करण्यात आली आहे. सदर योजनेची फलनिष्पत्ती पाहता महावितरण कंपनीचा कोणताही आर्थिक संबंध नसलेली महावितरण कंपनीतील ६५ वर्षापर्यंतच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी विमा योजना सुरु करण्याची मागणी करण्यात आली होती.

दि ओरिएंटल इन्शूरन्स कंपनी लिमिटेड, पुणे यांच्या प्रतिनिधींशी झालेल्या चर्चेनुसार महावितरण कंपनीतील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी Tailormade floater Group Mediclaim Insurance Policy चा प्रस्ताव दि ओरिएंटल इन्शूरन्स कंपनी लिमिटेड, पुणे यांनी सादर केला असता त्यास तिन्हीं कंपन्यांच्या व्यवस्थापकीय संचालकांनी तिन्हीं कंपन्यांच्या संचालक (वित्त) व कार्यकारी संचालक (मासं) यांच्याशी विचारविनिमय करुन मान्यता दिली आहे.

**महावितरण कंपनीतील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी असलेली Tailormade Floater Group Mediclaim Insurance Policy ची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.**

सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी असणाऱ्या या पॉलिसीचा हप्ता सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी परस्पर दि ओरिएंटल इन्शूरन्स कंपनी लिमिटेड, पुणे यांच्याकडे डी.डी. द्वारे भरणा करावयाचा असून सदर पॉलिसीमध्ये परिस्थितीनुसार बदल करावयाचे झाल्यास त्याचे अधिकार पूर्णपणे विमा कंपनीकडे असून यामध्ये महावितरण कंपनीमार्फत कुठलीही कार्यवाही करण्यात येणार नाही अथवा कंपनी या योजने संदर्भातील कुठलीही जबाबदारी स्वीकारणार नाही. महावितरण कंपनीचा सदर योजनेसंदर्भात कोणताही सहभाग नाही. सबब, या योजनेच्या कार्यान्वयातून उद्भवणाऱ्या कोणत्याही बाबींशी महावितरण कंपनीचा संबंध असणार नाही. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी या योजनेसंदर्भातील सर्व अटी व शर्तींचा अभ्यास करुन तसेच त्यासंदर्भातील शंकांचे दि ओरिएंटल इन्शूरन्स कंपनी लिमिटेड, पुणे यांच्या प्रतिनिधींकडून निरसन करुन घेतल्यानंतरच योजनेत सहभागी होण्याचा निर्णय त्यांचे स्तरावर घ्यावा.

**सदर पॉलिसीचा लाभ महावितरण कंपनीतील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना घेता येईल तथापि, पॉलिसी घेताना सदर कर्मचाऱ्याचे वय वर्षे ६५ पेक्षा जास्त नसावे.**

१) Tailormade Floater Group Mediclaim Insurance Policy चा PROVISIONAL POLICY NO R/१६३५००/४८/२०१६/१५८ असा आहे.
२) Tailormade Floater Group Mediclaim Insurance Policy चा कालावधी दि. ०१/०७/२०१५ च्या मध्यरात्रीपासून ते ३०/०६/२०१६च्या मध्यरात्रीपर्यंत असा एक वर्षाचा राहील.
३) **सदर पॉलिसीसाठी पूर्व वैद्यकीय चाचणीची आवश्यकता नाही.**
४) सदर पॉलिसीकरिता कॅशलेस सुविधा उपलब्ध आहे.
५) सदर पॉलिसी floater तत्वावर आधारित असून **या पॉलिसीकरिता कुंटुबाची मर्यादा १+१ असेल म्हणजेच सेवानिवृत्त कर्मचारी व त्यांची पत्नी / पती, यांचा समावेश असेल.**
६) वरील पॉलिसीसोबत **फक्त सेवानिवृत्त कर्मचाऱ्याला रु. १ लाखाचा वैयक्तिक अपघात विमा मोफत देण्यात येणार आहे.**

७) विमा कंपनीने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना **सध्या असलेल्या आजारांचा समावेश** या योजनेत करण्यात आला असल्याचे तसेच **योजनेत सहभाग घेतल्यापासूनच्या पहिल्या ३० दिवसातील आजार व पहिल्या दोन वर्षासाठी वगळण्यात येणाऱ्या आजारांचा देखील समावेश या योजनेत करण्यात आला आहे, असे महावितरण कंपनीला कळविले आहे.**

८) सदर योजने अंतर्गत पॉलिसीची रक्कम रु. १ लाख / २ लाख / ३ लाखापर्यंत मर्यादित असून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी त्यांच्या आवश्यकतेनुसार पॉलिसीची निवड करावयाची आहे.

९) महावितरण कंपनीतील सेवानिवृत्त कर्मचारी व त्यांच्या अवलंबित पती / पत्नीसाठी रु. १ ते ३ लाखापर्यंत संयुक्त विमा रकमेसाठी विम्याचा हप्ता सेवाकरासह खालीलप्रमाणे राहील. **(या पॉलिसीचा विमा हप्ता वर्तमान बाजार मुल्यापेक्षा अत्यंत माफक दरात सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांकरिता देण्यात आलेला आहे.)**

**माहे जुन २०१५ पर्यंत सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांसाठी विम्याचा हप्ता (सेवाकरासहीत) खालीलप्रमाणे राहील.**

| रु. १ लाखाकरिता विमा हप्ता रक्कम | रु. २ लाखांकरिता विमा हप्ता रक्कम | रु. ३ लाखांकरिता विमा हप्ता रक्कम |
|---|---|---|
| रु. ८९८९ | रु. १७९७८ | रु. २४७१९ |

**माहे जुलै २०१५ पासून सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी विम्याचा हप्ता (सेवाकरासहित) खालीलप्रमाणे राहील असे विमा कंपनीने कळविले आहे.**

| अ.क्र | सेवानिवृत्तीचा महिना | रु. १ लाखांकरिता विमा हप्ता रक्कम रुपयामध्ये | रु. २ लाखांकरिता विमा हप्ता रक्कम रुपयामध्ये | रु. ३ लाखांकरिता विमा हप्ता रक्कम रुपयामध्ये |
|---|---|---|---|---|
| १ | माहे जुलै २०१५ मध्ये सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी | ८२४० | १६४८० | २२६५९ |
| २ | माहे ऑगस्ट २०१५ मध्ये सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी | ७४९१ | १३७३३ | २०६०० |
| ३ | माहे सप्टेंबर २०१५ मध्ये सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी | ६७४२ | १२३६० | १८५३९ |
| ४ | माहे ऑक्टोबर २०१५ मध्ये सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी | ५९९३ | ११९८५ | १६४७९ |
| ५ | माहे नोव्हेंबर २०१५ मध्ये सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी | ५४४४ | ९६१३ | १४४१९ |
| ६ | माहे डिसेंबर २०१५ मध्ये सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी | ४४९५ | ८२४० | १२३५९ |
| ७ | माहे जानेवारी २०१६ मध्ये सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी | ३७४५ | ६८६७ | १०३०० |
| ८ | माहे फेब्रुवारी २०१६ मध्ये सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी | २९९६ | ५४९३ | ८२३९ |
| ९ | माहे मार्च २०१६ मध्ये सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी | २२४७ | ४१२० | ६१७९ |
| १० | माहे एप्रिल २०१६ मध्ये सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी | १४९८ | २७४७ | ४११९ |
| ११ | माहे मे २०१६ मध्ये सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी | ७४९ | १३७३ | २०५९ |


**Tailormade floater Group Mediclaim Insurance Policy मध्ये सेवानिवृत्त कर्मचाऱ्यास सहभागी होण्यासाठी खालीलप्रमाणे प्रक्रिया ऑनलाईन पूर्ण करावी लागेल.**

**ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी मार्गदर्शक सूचना :**

१) सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी सर्व प्रथम www.mdindiaonline.com:91 या संकेतस्थळावर जावे.

२) त्यानंतर कर्मचारी ज्या कंपनीतून सेवानिवृत्त झालेला असेल त्या कंपनीची निवड करावी.





३) सेवानिवृत्त कर्मचाऱ्याने आपला सेवानिवृत्तीपूर्वीचा CPF No. क्रमांक टाकावा.

४) उपरोक्त संकेत स्थळावरील आवश्यक ती माहिती त्या-त्या रकान्यामध्ये पूर्णपणे भरावी.

५) सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी त्यांना आवश्यक असणाऱ्या विमा रकमेच्या रु. १ ते ३ लाख या विकल्पापैकी एकाची निवड करावी.

६) निवड केलेल्या विम्याच्या वार्षिक हप्त्याच्या रकमेचा Demand Draft 'दि ओरिएन्टल इन्शूरेन्स कंपनी लि.' च्या नावे पुणे येथे देय असणारा काढावा. तद्‌नंतर उपरोक्त संकेतस्थळावरील माहितीच्या रकान्यामध्ये Demand Draft No. , Demand Draft Date & Bank Name याची अचूक नोंद करावी.

७) उपरोक्त माहिती संपूर्ण भरल्याची खात्री केल्यानंतर 'Confirm' बटन दाबावे. बटन दाबताच URN No. मिळेल. या URN No. ची नोंद सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी डी.डी. च्या मागे करुन भरलेल्या माहितीची प्रिंट घ्यावी.

८) तद्‌नंतर भरलेल्या **माहितीची प्रिंट कॉपी व विमा हप्त्याच्या रकमेचा D.D. दि ओरिएन्टल इन्शूरन्स कंपनी लि., पुणे** यांच्या नावे असलेल्या **एक्सिस बँकेतील खाते क्र. ९१५०२०००८२९८८८४ मध्ये भरणा करुन त्याची पावती सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी पुढील लाभाकरिता जपून ठेवावी.**

सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना M D India (TPA) च्या नेटवर्क रुग्णालयामध्ये वैद्यकीय उपचारासाठी कॅशलेस सेवेचा लाभ मिळेल. विनानेटवर्क रुग्णालयामध्ये कर्मचाऱ्यांनी उपचार घेतल्यास M D India (TPA) विमा पॉलिसीच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून कर्मचाऱ्यांना वैद्यकीय उपचारांची प्रतिपूर्ती करतील. **सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना** Tailormade floater Group Mediclaim Insurance Policy संदर्भात स्पष्टीकरण, **माहिती किंवा रुग्णालयात दाखल होण्यासाठी अथवा वैद्यकीय प्रतिपूर्तीचा दावा दाखल करण्यासाठी करावयाच्या प्रक्रियेकरिता मदतीची / चौकशीची गरज असल्यास सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी श्री. लाखे, विभागीय व्यवस्थापक, दि ओरिएन्टल इन्शूरेन्स कंपनी लि., विभागीय कार्यालय ३, पुणे यांच्याशी भ्रमणध्वनी क्रमांक - ९८९०६३२६४४ व दुरध्वनी क्रमांक - ०२०-२६४५३०३४ यावर संपर्क करावा.** सदर विमा योजना ही दि ओरिएन्टल इन्शूरन्स कंपनी लि., पुणे यांच्याद्वारे सुरु करण्यात येत असल्याने व या योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी विम्याचा हप्ता व्यक्तीगतपणे परस्पर विमा कंपनीच्या बँक खात्यावर भरणा करावयाचा असल्याने याबाबत महावितरण कंपनीतील कोणत्याही कार्यालयास या संदर्भात विचारणा करु नये.

सदर योजनेचा लाभ महावितरण कंपनीमधून सेवानिवृत्त झालेल्या व होणाऱ्या कर्मचाऱ्यांना मिळावा याकरिता सदर परिपत्रकास कक्ष पातळीपर्यंत प्रसिध्दी देण्यात यावी व शक्य झाल्यास सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पत्त्यावर सदर परिपत्रक पाठविण्याची कार्यवाही करावी.

सदर परिपत्रक कंपनीच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावरील "MSEBHCL Mediclaim" या शिर्षकाखाली उपलब्ध असून त्याची मुद्रांकित प्रत (Hard Copy) प्रसारीत करण्यात येणार नाही. कर्मचाऱ्यांच्या सोयीकरिता सदर परिपत्रक महावितरणच्या Intranet – RAPDRP या संकेत स्थळावरील Industrial Relations Department यावर www.mdindiaonline.com:91यावर देखील उपलब्ध आहे.

24.6.2015

(नीलेश र. गटणे)
कार्यकारी संचालक (मासं)

प्रति,
सर्व कार्यकारी अभियंता व तत्सम दर्जाचे अधिकारी यांचेपर्यंत म.रा.वि.वितरण कंपनी मर्यादित.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :**

१) व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वितरण कंपनी मर्या., मुंबई.

२) संचालक (वित्त) / (संचलन) / (प्रकल्प), म.रा.वि.वितरण कंपनी मर्या., मुंबई.

**प्रत सस्नेह :**

कार्यकारी संचालक (मासं), महानिर्मिती / महापारेषण.

- सदर योजना महानिर्मिती व महापारेषण कंपनीच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी सुध्दा लागू करण्यास अनुमती देण्यात आली आहे, हे विचारात घेता आपल्या स्तरावर पुढील कार्यवाही करावी ही विनंती.